लोकमत



जनता विद्यालयातील विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

# जनता विद्यालयात सायबर गुन्हेविषयक शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

**टेंभुर्णी :** प्रतिभा कॉलेज चिंचवड व क्विक हिल कंपनीच्या वतीने सायबर वॉरियरस द्वारा सायबर गुन्हेविषयक येथील जनता विद्यालय व ज्युनिअर कॉलेजमध्ये जनजागृती मोहीम राबविण्यात आली. जनता विद्यालयातील विद्यार्थांना सायबर गुन्हे विषयक जनजागृती करण्यात आली.

आजची तरुण पिढी मोबाइलचा जास्तीतजास्त वापर करत आहेत. इंटरनेटच्या जगात आपल्याला एका क्लिकवर सर्व माहिती मिळत असली, तरी त्याच्या चुकीच्या वापराने अनेक दुष्परिणामाला सामोरे जावे लागते. मोबाइलद्वारा चुकीच्या लिंक ओपन करणे किंवा ओटीपी शेअर करणे, मुलींच्या फोटोचा गैर वापर करणे, ऑनलाइन आर्थिक व्यवहार फसवणूक कशी होते. याबाबत कोठे तक्रार करावी, अशा विविध सुरक्षेविषयी सायबर सिक्युरिटीची जनजागृती वॉरियर्सद्वारा माहिती देण्यात आली. यावेळी मानसी वाडेकर, श्रावणी सावंत या विद्यार्थिनी शिक्षिका हर्षिता वन्चानि व उज्ज्वला बोरोले, सुप्रिया गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य करत आहेत. प्रस्तावना शिक्षिका सविता जगताप यांनी केली. यावेळी सादिक मोमीन, राजशेखर महामुनी, सूर्यकांत पाटील, विरांग मेथा, गणेश माढेकर आदी उपस्थित होते.